ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 4 | May - 2016

Indian Streams Research Journal





# भारतीय बालशिक्षण चळवळीतील ताराबाई मोडक यांचे योगदान

**डॉ. संदेश वाघ**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

## प्रास्ताविक-

बालशिक्षणाची चळवळ जरी गिजुभाई बधेका यांनी सुरू केली असली तरी ही चळवळ समजून घेऊन तिला योग्य स्वरफप देण्याच्या कार्यात ताराबाई मोडक यांचा फार महत्त्वाचा सहभाग होता. ताराबाईंनी मागासलेल्या व ग्रामीण भागात शिक्षण पोहचवण्यासाठी जी अविश्रांत मेहनत घेतली त्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्र्रात त्यांना विशिष्ट प्रकारचे स्थान प्राप्त झाले आहे. ताराबाई मोडक यांचा जन्म इंदुर येथे दिनांक १९ एप्रिल १८९२ साली केळकर घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्री सदाशिव पांडुरंग केळकर व मातोश्रीचे नाव उमाबाई हे होय.

ताराबाईच्या वडिलांचे वास्तव्य इंदुर येथे असल्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण हिंदीतून झाले. चौथीनंतरचे प्राथमिक शिक्षण पुण्याच्या हुजूरपागेत व नंतर मुंबईच्या अलेक्झांड्रा गर्ल्सस्कूल हायस्कुलमध्ये झाले. इ.स. १९०९ साली त्या मॅट्रिक झाल्या व नंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून इ.स. १९१४ मध्ये त्या बी.ए. झाल्या.

इ.स. १९१५ साली ताराबाईचे लग्न श्री कृष्णाजी वामन मोडक यांच्याशी झाले. श्री मोडक अमरावती येथे वकिली करत होते. इ.स. १९२० मध्ये ताराबाईंना एक कन्यारत्न प्राप्त झाले. त्यांची मुलगी एक वर्षाची असताना राजकोट येथील बार्टन फिमेल ट्रेनिंग कॉलेजच्या मुख्याध्यापक पदावर ताराबाईची नेमणूक झाली. येथे शिक्षणाचे कार्य करीत असतानाच त्यांनी इ.स. १९२३ मध्ये भावनगर येथील गिजुभाईच्या बालमंदिरास भेट दिली. ही भेटच त्यांच्या जीवन कार्याला वळण देणारी ठरली.

## गिजुभाईच्या सहकारी ताराबाई -

राजकोट येथील सरकारी ट्रेनिंग कॉलेजमधील चांगल्या पगाराची नोकरी सोडून श्री दक्षिणामूर्ती भवनाच्या बालमंदिरात ताराबाई अत्यंल्प वेतन स्विकारून काम करू लागल्या. या प्रसंगाविषयी लिहिताना आचार्य कालेलकरांनी एका ठिकाणी म्हटले आहे. गिजुभाईना अध्यापन कार्यात साथी मिळाल्या. मॉंटेसरीचे साहित्य गिजुभाई व्दिज बनले आणि ताराबाई मोडकांचे सहाय्य मिळवून ते समर्थ बनले.

श्रीमती ताराबाईनी इ.स. १९२३ ते १९३२ या कालावधीत बालमंदिरात कार्य केले. हया नउफ वर्षात त्यांनी बालमंदिराची शिक्षिका बालअध्यापन मंदिराची अध्यापिका, नूतन बालशिक्षण संघाच्या कार्यकर्त्या, शिक्षण पत्रिकेच्या संपादिका, बालसाहित्य मालेच्या लेखिका व संपादिका अशा अनेक भुमिकेत बालशिक्षणाच्या सेवेला स्वत:ला वाहून घेतले होते. या काळातील त्यांच्या लिखाणातील तर्कशुध्दता आणि गिजुभाईच्या लिखाणातील भावदर्शन हया विशेष गुणामुळे शिक्षणपत्रिका अत्यंत लोकप्रिय बनली होती.

## शिशुविहारची स्थापना-

ताराबाईनी सौराष्ट्रातील भावनगरमध्ये बालशिक्षणाचे जे अंग आत्मसात केले, त्याची प्रतिकृती त्यांनी मुंबईत दादर येथे शिशुविहारची स्थापना करत निर्माण केली. नव्या पिढीच्या असंख्य बालकांना या नवशिक्षणाचा लाभ मिळावा, शास्त्रीय बालशिक्षणाचे स्वरूप समाजाला माहिती व्हावे आणि पालकामध्ये त्याची गरज निर्माण व्हावी असे व्यापक हेतू शिशूविहारच्या स्थापनेमागे होते. शिशूविहारमध्ये बालअध्ययन मंदिराची स्थापना करून तेथे दोन अभ्यासक्रम सुरफ करण्यात आले. एक सहा महिन्यांचा अभ्यासक्रम हा मुख्यत्वेकरून शहरातून जिथे बालशाळा आहेत पण त्या व्यवस्थित शास्त्रशुध्द चालु नाहीत आणि असंख्य खेडयातून त्या अल्पखर्चात सुरफ व्हाव्यात या उद्देशाने सुरू करण्यात आला. दुसरा अभ्यासक्रम मात्रा मॉंटेसोरी पध्दतीची शाळा चालविण्यासाठी सुरफ करण्यात आला होता.

दृ १९४५ पर्यत मुंबईत शिशूविहार शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रात मुख्यत: शहरी विभागात बालशिक्षणाचा खुपच प्रचार व प्रसार झाला. शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय झाली व या बालशाळांना जनमान्यता मिळाली. अध्यापन मंदिराच्या अभ्यासक्रमाला शासन मान्यता मिळून बाल अध्यापन मंदिरास शिक्षण खात्याचा सर्टिफिकेट कोर्सचा दर्जा प्राप्त झाला. अशा रितीने श्रीमती ताराबाईनी संस्थेचे कार्य अत्यंत धैयनि चालविले आणि पुढे नेले.

## बालशिक्षण दृष्टी-

श्रीमती ताराबाईच्या बालशिक्षण कार्याचे मुख्यत्वे दोन भाग पडतात. भारतीय बालशिक्षणाचे आदयप्रवर्तक गिजुभाई बधेका यांचे सहकारी बनून त्यांनी गिजुभाईच्या चळवळीत ज्या प्रकारे भाग घेतला तो एक व १९३३ च्या सुमाराला श्री दक्षिणामूर्ती भवन सोडून त्यांनी स्वतंत्रापणे मराठी प्रदेशात बालशिक्षणाची जी स्वयंप्रेरणेने सुरूवात केली तेव्हापासून चालू असलेला दुसरा भाग. त्यांच्या मते बालशिक्षण सर्वाना परवडले पाहिजे तसेच ते स्थानिक परिस्थितीनुसार असले पाहिजे. शैक्षणिक साधने परदेशातून न आणता खेडयामधून स्थानिक पातळीवर तयार केली पाहिजेत आणि तीही शक्यतो शिक्षकांनीच करावी किंवा खेडयातील कारागिराकडून करवून घेतली पाहिजेत.

## ग्रामबाल शिक्षा केंद्राची स्थापना -

२४ डिसेंबर १९४५ साली ताराबाईनी बोर्डी येथे नूतन बाल शिक्षण संघाच्या वतीने ग्राम बाल शिक्षा केंद्र या नव्या संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या उद्‌घाटनाला त्यावेळचे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री बाळासाहेब खेर आले होते. उद्‌घाटनाच्या भाषणात मुख्यमंत्री म्हणाले होते, इतकी लहानशी बालशाळा चालवायची होती तर ताराबाई मुंबई सोडून तेवढयासाठी इकडे कशाला आल्या? मुंबई राज्याच्या मुख्यमंत्र्यांना कशाला बोलवले. मीही सर्व कामे बाजूला ठेवून येथे लहानशा खेडयात या लहानशा बालमंदिराचे उद्‌घाटन करण्यासाठी का आलो? कारण एका लहानशा बीजातूनच महान वृक्षाची उत्पत्ती होते. बालशिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. उदयाच्या स्वतंत्रा भारतातील बालकांना आपणास घडवावे लागणार आहे. त्यांच्यावर राष्ट्रीय वत्रत्तीचे संस्कार करावे

लागणार आहेत. हे अत्यावश्यक गरजेचे कार्य ताराबाई करीत आहेत. पुढच्या अनंत पिढयांना घडविण्याचा तंत्र व मंत्र त्या शिक्षण क्षेत्रात निर्माण करतील.

## बालवाडी शब्दाची उत्पत्ती -

बालवाडी या शब्दाची उत्पत्ती बोर्डीतच झााली. गुजरातमधील प्रसिध्द शिक्षणतक्ष श्री जुगतरामभाई दवे हे बोर्डीला ताराबाईचे काम पाहायला नेहमी येत असत. बालमंदिराविषयी चर्चा करीत असताना त्यांनी एकदा ताराबाईना म्हटले की, बोर्डीला चिकूच्या, पपनसच्या, नारळाच्या बागा आहेतत्याला येथील लोक वाडया म्हणतात. जसे चिकुची वाडी, नारळाची वाडी तसे तुमच्या या मुलांच्या बालमंदिराला बालवाडी म्हटले तर कसे होईल. ताराबाईना हा शब्द अतिशय आवडला व त्यांनी आपल्या बालमंदिराचे नामांतर बालवाडी असे केले. तेव्हापासून हा शब्द बालशिक्षण क्षेत्र्यात प्रचारात आला व ग्रामीण भागातील सर्व बालमंदिरांना बालवाडी ही संज्ञा मिळाली. तोच शब्द आज भारतभर प्रचारात आहे.

## विकासवाडीची कल्पना व स्वरूप -

इ.स. १९६१ च्या पत्रिकेत लिहिलेल्या एका लेखात त्या म्हणतात, एकंदर पाच वर्षाच्या प्रयोगावरून ग्राम बाल शिक्षा केंद्राच्या संचालकांना असे दिसून आले की या परिस्थितीमध्ये अगदी निराळया प्रकारची संस्था निघावयास हवी आहे. येथे अगदी पाळण्यातील मुलांपासून ते प्राथमिक शाळेच्या वयाच्या शिक्षणाचे प्रश्न हाती घेतले पाहिजेत. सामाजिक जीवनाचा पाया बालमंदिरातच घालणे अगत्याचे आहे जातीद्वेष, परधर्मीय व परप्रांतीय लोक यांच्या संबंधीचा दृष्टीकोन वगैरे विषारी रोपटी या वयातच मुळासकट उपटून काढणे शहाणपणाचे ठरेल.

आदिवासी बालकांना सक्तीने शाळेत पाठविणे म्हणजे त्यांना सक्तीने उपाशी ठेवण्यासारखे आहे. या विचारांचे चिंतन करता करता विकासवाडीची कल्पना ताराबाईना सुचली. विकासवाडी हेच आदिवासींच्या बालशिक्षणाच्या अत्यंत बिकट प्रश्नाचे उत्तर असू शकेल. म्हणून त्या अनुताईना सांगतात, पाळणाघर, बालवाडी व त्यांना जोडून प्राथमिक शाळा अशी शिक्षणाची सोय त्यांच्या त्यांच्या वस्तीतून व्हायला हवी म्हणजे हळूहळू या सर्व गोष्टी सुधारणेच्या मार्गावर येतील हा ताईचा विचार पक्का झाला. त्यातून विकासवाडीचा जन्म झाला. आदिवासीच्या घरातील सर्वच वयाच्या मुलांना एकत्रितपणे शाळेत आणून स्थिर करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

आदिवासी लोक शिक्षणाच्या आग्रहाला बळी पडून आपली मुले नियमितपणे शाळेत पाठवीत नाही हे ताईच्या लक्षात आल्यावर त्यांनी ज्या शिक्षणाने त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल असे शिक्षण देण्याचे ठरविले. विकासवाडीची योजना यशस्वी होण्यासाठी पुढील गोष्टीकराव्यात असे ताईनी सुचविले १) शरीरस्वच्छता २) बालवाडीतील सफाई ३) फराळ व जेवण ४) हालचालीचे शिक्षण ५) गप्पागोष्टी ६) गोष्टी, बालनाटके, बालगीते राससंगीत वगैरे ७) बालखेळ ८) बालप्रवास ९) हस्तव्यवसाय १०) बागकाम ११) प्रार्थना व शांतीचा खेळ १२) भाषा संस्कार १३) शब्दभंडाराची वाढ. विकासवाडीचे कामकाज सकाळी ८ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालत असे.

## कुरणशाळा व उद्योगशाळा-

बोर्डीला अंगणवाडीचा प्रयोग करीत असताना आदिवासींच्या शिक्षणातील अडचणींची कल्पना ताराबाईना आलेली होती. कोसबाडला काम सुरू केल्यानंतर सुध्दा त्याच अडचणी समोर येउफ लागल्या. त्यावर मार्ग काढण्यासाठी चिंतन विचारविनिमय केल्यानंतर एक बाब लक्षात आली ती म्हणजे या मुलांना गुरे चारण्यासाठी घेऊन जावे लागते त्यावरही ताराबाई उपाय सांगतात, ठिक आहे, मुले शाळेकडे येत नाहीत नाघ मग आपण आपली शाळाच जेथे मुले असतील तेथे नेऊ या. आपले शिक्षक कुरणात जातील व तेथेच गुरे चारण्याच्या कामाबरोबर शाळा चालवतील तीच कुरणशाळा.

आठ-नऊ वर्षाची मुले वाडीत व इतरत्र मजूरीला जातात म्हणून ती शाळेत येत नाहीत. या मुलांना शाळेतच रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून त्यांनी उदयोगशाळा सुरू केली म्हणजे मुले अर्धवेळ काम करतील व अर्धवेळ शिक्षण घेतील. अशाप्रकारे

उद्यानशाळा, रात्रशाळा, प्रौढशिक्षणवर्ग, बालगोपाळमंडळे, क्रिडाकेंद्रे, छंदवर्ग, निसर्गभ्रमण, रंजन कार्यक्रम, लेखन वाचन मंडळे असे अनेकविध उपक्रम त्यांनी सुरू केले. त्यामुळे मुलांच्या व विशेषत: पालकांच्या मनात शिक्षणाबद्दल आस्था निर्माण झाली.

## सारांश -

बालशिक्षणाची नवीन पध्दती तयार करफन ती जनमाणसात रफजविण्यासाठी ताराबाई मोडक यांनी आपल्या आयुष्याचे अर्धशतक वेचले. आज गल्लोगल्ली व खेडोपाडी जे बालशिक्षणाचे उदंड पीक दिसत आहे त्यासाठी भूमी नांगरण्याचे व बीज रोवण्याचे कार्य ताराबाईंनी केले. बालशाळा, बालवाङ्मय, बालशिक्षणाची साधने, बालशिक्षकांचे, प्रशिक्षकांचे प्रशिक्षण, पालकांचे प्रबोधन बालशिक्षणाच्या दुर्लक्षित क्षेत्राकडे समाजाचे व शासनाचे लक्ष वेधणे अशा विविध अंगानी त्यांनी भारतातील आणि विशेषत: सौराष्ट्र, गुजरात व महाराष्ट्रातील बालशिक्षण सुदृढ केले. भारतातील बालशिक्षणाचे पहिले आंदोलन ताराबाईंच्या भावनगरला १९२३ साली सुरू केलेल्या बालशिक्षणाच्या कार्यापासून सुरू झाले आणि ते त्यांनी अखेरपर्यंत जिद्दीने सांभाळले व वाढविले.

ताराबाई मोडक यांनी ज्यांना मनोमन बालशिक्षणातील गुरू मानले होते त्या मॅडम मॉंटेसोरी यांच्या जन्मदिनी म्हणजे ३१ ऑगस्ट या दिवशीच १९७३ साली त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या या कार्याबद्दल भारत सरकारने १९६४ साली पद्मभुषण हा किताब देऊन त्यांचा यथोचित गौरव केला.

## संदर्भसूची-

१. प्रा. पानसे रमेश (संपा.); बालकेंद्री शिक्षण व बालशिक्षणाचा भारतीय इतिहास, शिशूविहार मंडळ प्रकाशन दादर १९९७ पृष्ठ क्रं. ९०.
२. डॉ.न्यायाधिश विनायक (संपा.); बालशिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक स्मत्रतीग्रंथ, शिशूविहार मंडळ प्रकाशन दादर १९९२ पृष्ठ क्रं.४.
३. डॉ.न्यायाधिश विनायक (संपा.) बालशिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक स्मत्रतीग्रंथ, शिशूविहार मंडळ प्रकाशन दादर १९९२ पृष्ठ क्रं.५.
४. प्रा. पानसे रमेश (संपा); बालकेंद्री शिक्षण व बालशिक्षणाचा भारतीय इतिहास, शिशूविहार मंडळ प्रकाशन दादर १९९७ पृष्ठ क्रं.१००.
५. चिटणीस अशोक (संपा.); कोसबाडच्या टेकडीवरफन अनुताई वाघ, ग्रामबाल शिक्षा केंद्र ठाणे, प्रकाशन १९८० पृष्ठ क्रं.११२.
६. डॉ.न्यायाधिश विनायक (संपा.); बालशिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक स्मत्रतीग्रंथ, शिशूविहार मंडळ प्रकाशन दादर १९९२ पृष्ठ क्रं. ७.